साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी  एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २८ ● मंगळवार, दि. २ ते ९ डिसेंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

# वाशिमच्या बालवैज्ञानिकाची नॅशनलसाठी निवड

**वाशिम,दि.१ डिसेंबर (जिमाका) वाशिमच्या बाल समुपदेशक, दिव्यांग बाल शास्त्रज्ञचे इंन्सपायर मानक टिमकडून भरभरून कौतुक झाले आहे. त्यांच्या सर्वच क्षेत्रातील विशेषतः समुपदेशक कार्याचाही गुण गौरव करण्यात आला होता. २७ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत भंडारा जिल्ह्यातील शहापूर येथे स्टेट लेव्हल साठी भाग घेतला होता. त्यामध्ये जिल्हास्तरावर जिंकून आलेले ३७५ पेक्षा जास्त मॉडेल संपूर्ण महाराष्ट्रातून सहभागी झाले होते. त्यातून विविध निकषांवर शास्त्रज्ञ जजिंग पॅनलने ३४ जणांची निवड दोन वर्षांतून केली आहे. दोन वर्षांचे एकत्रित राज्यस्तरीय प्रदर्शन होते. त्यामध्ये वाशिमचा एकमेव दिव्यांग विराजचे भरभरून कौतुक ही वाशिमकरांसाठी अभिमानाची बाब आहे.**

## इंन्सपायर मानक टिमकडून कौतुक
## महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा विराज शिंदे



त्याचा इंस्पायर अवार्डचा प्रवास हा खुपचं संघर्षाचा ठरला. त्याच्या संशोधनावर झाली टिका, मागील शाळेचा व मार्गदर्शकाचा असहकार, प्रचंड तणाव व प्रोजेक्ट पुर्ण करतांना वेळेची कमतरता यामुळे काहीश्या खचलेल्या विराजच्या मदतीस सामान्य वाशिमकर धावून आलेत.

कौतुक करत साहित्याची उपलब्धता करून देत सर्वोतोपरी मदत केली. त्यामुळे माझ्या यशात वाशिमकरांचा वाटा आहे,असे तो म्हणतो .यामध्ये शिक्षणाधिकारी मंगला धुपे , संजय ससाणे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव वर्ल्ड स्कूलचे संचालक बाजड सर व मुख्याध्यापक व सुतावणे, माजी प्राचार्य शास्त्रज्ञ विजय भड, आर. ए. कॉलेजचे कॉम्पुटर डिपार्टमेंटचे प्रा.गवळी सर व प्रा. ठाकूर सर रत्नप्रभा आ.रो मशिन शॉपचे मालक निशांत पाखरेजी, शंकर ॲग्रो इंडस्टीजचे मालक कापसे बंधू , जिल्हा रुग्णालयातील कार्यरत रामकृष्ण धाडवे, बि.आर.डी.एस. अकोल्याचे विशाल सर, व अजय वाघचौरे, भवानी स्टिल मेकर श्री. देसाई, रात्री १२वाजता बॅनर करून देणारे क्रिएशनचे परळीकर दादा, सुंदर वाटिकेतील राऊत सर व इंजि. निखिल काटे व साहिल दादा, या सर्व असामान्य वाशिमकरांनी विनामूल्य तर कोणी अल्पमुल्यात मदत केली व त्याच्या कल्पनेतील संशोधन पूर्ण केले. विशेष म्हणजे इंस्पायरचे समन्वयक विजय भड, तारांगण इंग्लिश स्कूल धनज बु, भाऊ,एस.पी.ए विजयवाड्याचा विद्यार्थी शंतनु शिंदे व माता पिता यांनी विराजला योग्य व वेळेवर सहकार्य व प्रोत्साहन दिले.

यासाठी मी नॅशनलमध्ये वाशिम जिल्हाचे नाव उंचावणार असा विश्वास व आभार विराजने व्यक्त केला आहे. आता महाराष्ट्राच्या नावासाठी मला जबाबदारीने काम करायला हवे असे मत विराजने व्यक्त केले आहे.

■ विधानसभा आणि विधानपरिषद विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत निर्णय

# राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर कालावधीत नागपूर येथे होणार

मुंबई, दि. १ महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार दि. ८ ते रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. दि. १३ डिसेंबर शनिवार आणि दि. १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार,दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू,अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळेसंबंधित अधिकारी उपस्थित होते.

'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या ऐतिहासिक पर्वानिमित्त दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती.

या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत सांगितले.

# नवोदय निवड चाचणीचे हॉलटीकीट डाउनलोड सुरू

वाशिम,दि.१ डिसेंबर (जिमाका) इयत्ता ६ वी सत्र २०२६-२७ च्या प्रवेशासाठी होणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेचे हॉल टीकीट / परीक्षा प्रवेशपत्र डाउनलोड करणे सुरू झाले आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, दिल्ली मार्फत दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी ही परीक्षा घेण्यात येणार आहे.

विद्यार्थी व पालकांना https://cbseitms.rcil.gov.in/nvs/ या संकेतस्थळावरून हॉल टीकीट डाउनलोड करता येणार आहे. हॉल टीकीटवर नाव, फोटो, जन्मदिनांक किंवा इतर माहितीमध्ये त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्तीसाठी जवाहर नवोदय विद्यालय,वाशिम येथे संपर्क साधावा.मदत केंद्रासाठी खालील क्रमांक उपलब्ध आहेत.

राजेश कुमार ठाकुर ह्न ७९७२४८७९८२

प्रशांत खंडाळकर ह्न ९६०४५६७०९०

दीपक घोडे ह्न ९८९३६३८९३६

विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्र, प्रवेश वेळ व आवश्यक कागदपत्रांची माहिती हॉलटीकीटवरून बारकाईने तपासावी, असे आवाहन प्राचार्य सचिन खरात यांनी केले आहे.

# सर्व नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला

## मतदानोत्तर चाचण्यांच्या निष्कर्षांना २० डिसेंबरपर्यंत बंदी

मुंबई, (रानिआ): राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान संपल्याच्या पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. मतदान यंत्रांची हाताळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी २४ तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदामाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोदामांबाबत आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेबाबत अवगत करावे. त्याचबरोबर निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदामाचे प्रवेशद्वार दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी, असेही निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झाले; तसेच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# कामगार संहितेमुळे आधुनिक आणि दूरदर्शी युगाचा प्रारंभ

भारत स्वातंत्र्यानंतर सर्वात परिवर्तनकारी कामगार सुधारणांपैकी एक असलेल्या सुधारणांच्या उंबरठ्यावर उभा आहे. वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामकाज अटी संहिता या चार सर्वसमावेशक कामगार संहितांची अंमलबजावणी, ही २९ केंद्रीय कामगार कायद्यांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यातून मुक्त करून सुलभ, तंत्रज्ञान-सक्षम आणि कामगार-केंद्रित व्यवस्थेकडे वाटचाल करण्याचे निर्णायक पाऊल आहे. ही सुधारणा केवळ प्रशासकीय बदल नसून, आत्मनिर्भर भारताच्या महत्त्वाकांक्षेला आधार देणारी निष्पक्ष, स्पर्धात्मक, समावेशक आणि भविष्यासाठी सुसज्ज कार्यदल परिसंस्था निर्माण करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचे संकेत देणारी संरचनात्मक पुनर्रचना आहे.

अनेक दशके भारताचे कामगार कायदे विसंगत, परस्परव्यापी होते. त्यामुळे कंपन्यांवर खूप मोठा नियामक भार पडत असे आणि अनुपालनाच्या प्रयत्नांत गुंतागुंत निर्माण होत असे. केंद्र आणि राज्य कायद्याअंतर्गत अनेक नोंदणी, परवाने आणि तपासणीमुळे खर्च वाढला, कामगार कल्याणापासून लक्ष विचलित झाले आणि अनेकदा उद्योग व नियामकांमध्ये अविश्वास निर्माण झाला. तुकड्यात विभागलेल्या कायद्यातील अस्पष्टतेमुळे अंमलबजावणी कमकुवत राहिली आणि 'इन्स्पेक्टर राज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मनमानी प्रथांना वाव मिळाला. परिणामी पारदर्शकता मर्यादित राहिली. नवीन कामगार संहिता देशभरात व्याख्या आणि अनुपालन गरजा यात संतुलन साधतात आणि 'एक देश, एक कामगार कायदा' या तत्त्वाला मूर्त रूप देतात. नियोक्ता आणि कर्मचारी दोघांनाही अधिक स्पष्टता, न्याय आणि सुलभ प्रक्रियांचा लाभ देतात. एकीकृत नोंदणी आणि डिजिटल प्रशासनामुळे अनावश्यक पुनरावृत्ती दूर होते, प्रक्रिया जलद होतात आणि उत्तरदायित्व वाढते. वेतन, लाभ आणि कामकाज अटी यांसाठी मानकीकृत व्याख्या संपूर्ण देशात लागू झाल्याने वाद कमी होऊन अनुपालन अधिक एकसमान होईल. थोडक्यात, नवीन कामगार संहिता ही पूर्वीची वसाहतकालीन वारशातील जटिलतेऐवजी नवोन्मेष, रोजगार निर्मिती आणि औद्योगिक वाढीस प्रोत्साहन देणारी, सुटसुटीत आणि कार्यक्षम रचना निर्माण करणारी आहे. कामगार संहितांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक सुरक्षेत लक्षणीय वाढ आणि विस्तार. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते, भारतातील सामाजिक सुरक्षा व्याप्ती २०१५ मध्ये लोकसंख्येच्या सुमारे १९ टक्के होती. ती वाढून २०२५ मध्ये ६४ टक्के पेक्षा जास्त झाली आहे. यामध्ये जवळजवळ ९४० दशलक्ष लोकांचा समावेश आहे. कामगार संहिता, कामगार कायद्याच्या केंद्रस्थानी असलेल्या सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा तरतुदींना संस्थात्मक बनवून पुढे नेणाऱ्या आहेत. कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य नियुक्ती पत्रांसह देशभरात किमान वेतनाचा प्रारंभ, यामुळे उत्पन्न सुरक्षा वाढते, औपचारिकीकरण सुलभ होते आणि श्रम बाजारपेठेत निष्पक्षता निर्माण होते. डिजिटल अर्थव्यवस्थेत कामाच्या विकसित होत असलेल्या स्वरूपाची, यातील गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांच्या वाढत्या संख्येनं होत असलेल्या समावेशाची दखल, या संहिता घेतात. प्रथमच, या कामगारांना कायदेशीर मान्यता मिळाली आहे आणि त्यांना डिजिटल ॲग्रीगेटर्सद्वारे काही प्रमाणात निधी देणाऱ्या विशेष सामाजिक सुरक्षा यंत्रणेद्वारे पाठबळ मिळणार आहे. राष्ट्रीय ई-श्रम पोर्टल, गिग आणि असंघटित कामगारांची वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण करते, ज्यामुळे त्यांना प्लॅटफॉर्म आणि स्थानांवर सामाजिक सुरक्षेची पोर्टेबिलिटी मिळून लक्ष्यित फायदे मिळू शकतात. उदाहरणार्थ एखाद्या डिलिव्हरी वर्करला सामाजिक संरक्षणापर्यंतची पोहोच न गमावता एका शहरातून दुसऱ्या शहरात किंवा एका ॲपवरून दुसऱ्या ॲपवर स्थानांतरित होणे शक्य होईल. संहितेअंतर्गत आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांकडेही लक्ष पुरवण्यात आले आहे. यात लाभ पोर्टेबिलिटी, वार्षिक प्रवास भत्ते आणि त्यांच्या असुरक्षा कमी करण्यासाठी एक समर्पित राष्ट्रीय हेल्पलाइनची तरतूद आहे. व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामकाज अटी संहिता कामाच्या ठिकाणी सुरक्षितता मानके उंचावते,

## फ्लॅश टँकमध्ये मतदार ओळखपत्र सापडल्यासंदर्भात माहिती देण्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे आवाहन

मुंबई, दि. २६ : मुंबई उपनगर जिल्हयातील अंधेरी भागात टॉयलेट फ्लॅश टँकमध्ये निवडणूक मतदार ओळखपत्र सापडल्याबाबत काही मुद्रित व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांत वृत्त व व्हिडीओ क्लिप प्रसारित झाली आहे. प्रसारित व्हिडीओ क्लिपमधून कोणताही बोध होत नाही. हे वृत्त सोशल मिडिया येथून घेऊन प्रसारित करण्यात आले असल्याचा खुलासा संबधीत माध्यमांनी केला आहे. त्याची चौकशी केली असता घटना कुठे घडली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे ही बातमी व व्हिडीओ क्लिपच्या अनुषंगाने २० नोव्हेंबर. २०२५ रोजी डी. एन. नगर पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबर अहवाल (त्रखठ-१२१८/२०२५) अज्ञाताविरुद्ध दाखल करण्यात आला आहे. तरी देखील या वृत्तातील क्लिपबाबत जर कोणत्याही नागरिकांस माहिती असेल तर त्यांनी निदर्शनास आणून द्यावी. त्याची संपूर्ण चौकशी करण्यात येईल, असे मुंबई उपनगर जिल्ह्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

# महिला सरपंच... आणि नवरा कारभारी? आता हा प्रकार थेट बंद!

## ग्रामपंचायत कार्यालयात नातेवाईकांना बसण्यास मनाई ; महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 158(3)(9) नुसार कारवाईची तरतूद

### नवरे आणि नातेवाईक कार्यालयात बसले तर थेट कारवाई

◆ अधिनियमानुसार सरपंचांच्या पदाच्या कामात कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने हस्तक्षेप केल्यास, फाईली हाताळण्याचा प्रयत्न केल्यास, कर्मचारी किंवा ग्रामस्थांवर दबाव टाकल्यास, कार्यालयात बेकायदेशीररीत्या बसल्यास,मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), गटविकास अधिकारी (BDO) किंवा सक्षम प्राधिकरण थेट कडक कारवाई करण्यास बांधील आहेत. या कारवाईत कार्यालयात प्रवेशबंदी, नोटीस, दंडात्मक पावले, तसेच पुढे गुन्हा दाखल करण्याचीही तरतूद आहे.

### गावोगाव चर्चा : "सरपंच महिला, पण आदेश नवऱ्याचे?"

◆ महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली निवडणूक तर महिलांनी लढवली, पण कारभार मात्र नातेवाईकांनी हाताळण्याची प्रवृत्ती वाढत चालल्याने ग्रामस्थही नाराजी व्यक्त करत आहेत.

### ग्रामस्थांचा प्रश्न सोपा आहे

◆ मतं महिलांना दिली... मग निर्णय पुरुषांनी का घ्यायचे?"अनेक महिला सरपंचांनीदेखील शासनाकडे नाराजी व्यक्त केली आहे की काही गावांत त्यांना खुर्चीत बसूही दिले जात नाही, तर कार्यालयात त्याच्याच घरातील लोक बसून निर्णय घेत असतात.

**वाशिम :** राज्यभरातील ग्रामपंचायतींमध्ये मागील काही वर्षांपासून वाढलेला "बायको सरपंच पण कारभार नवरा!" हा प्रकार आता थेट आळ्यावर येणार आहे.महिला आरक्षणातून निवडून आलेल्या सरपंचांच्या जागी त्यांचे नवरे, भाऊ, मेव्हणे किंवा इतर नातेवाईक ग्रामपंचायतीत बसून निर्णय घेत असल्याच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे, गटविकास अधिकाऱ्यांकडे (BDO) आणि पंचायतराज खात्याकडे सतत येत होत्या.

मिळालेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत कार्यालय हे केवळ निवडून आलेल्या व अधिकृत पदाधिकाऱ्यांचेच कार्यक्षेत्र आहे, नातेवाईकांचे नाही, हे शासनाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. अनधिकृत व्यक्तींच्या हस्तक्षेपावर रोख घालण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम 158(3)(9) नुसार कारवाई करण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत म्हणजे सार्वजनिक कार्यालय घरातील 'कारभाऱ्यांचा' अड्डा नाही**

ग्रामपंचायत ही लोकशाहीची प्राथमिक यंत्रणा असून कार्यालयातील प्रत्येक निर्णय नियमांनुसार आणि अधिकृत व्यक्तींकडूनच घेतला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका प्रशासनाने घेतली आहे.महिला प्रतिनिधींच्या सक्षमीकरणासाठी निवडून आलेल्या पदांचा बॅकडोअरने पुरुषांकडे जाणारा कारभार थांबवण्यासाठी सरकार आता कठोर भूमिका घेणार आहे.

**स्थानिक प्रशासनाची कडक भूमिका**

गटविकास अधिकारी, तहसील प्रशासन आणि जिल्हा परिषद अधिकारी यांनी गावस्तरीय बैठकांमध्ये याबाबतचे स्पष्ट निर्देश देण्यास सुरुवात केली आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात अनधिकृत व्यक्ती बसल्याची तक्रार मिळाल्यास तत्काळ पंचनामा करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.




## बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे दिव्यांग व्यक्तींना आवाहन

मुंबई दि. २७ : दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विहीत नमुन्यात दोन प्रतीत सादर करावा लागणार आहे. अर्जासोबत दिव्यांगत्वाचा दाखला, दोन पासपोर्ट साईज फोटो, जन्मतारखेचा दाखला किंवा वयाचा दाखला उत्पन्नाचा दाखला एक लाखापर्यंत तहसीलदार यांचेकडून, रहिवासी दाखला किंवा जागेचे प्रमाणपत्र रेशनकार्ड. दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे दाखले (नगरसेवक/संरपंच/ग्रामसेवक/एस.ई. ओ. यांचेकडून) संबंधित व्यवसायाचे खरेदी कोटेशन १ लाख ५० हजार पर्यंत, राष्ट्रीयकृत बँकेचे नांव व शाखा, व्यवसायाचे प्रोजेक्ट रिपोर्ट (सी. ए. कडील) ज्या जागेमध्ये व्यवसाय करणार आहे. त्या जागेची बृहन्मुंबई महानगरपालिका वॉर्ड ऑफिसमधील नोंद कागदपत्रे/संमतीपत्र/भाडे प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट लायन्सेस इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. इच्छुक दिव्यांग व्यक्तींनी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी. मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई ह्र ७१ येथे संपर्क साधावा. योजनांचे अर्ज कार्यालयात उपलब्ध असल्याचेही मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी प्रसीद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# सनराईज इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन साजरा



रिसोड : सनराईज इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या रोजमेरी जोश यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह राष्ट्रीय महानायकांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.

यानंतर कार्यक्रमांमध्ये पुढे प्राचार्या, शिक्षक व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे (सरनामा) एकत्रित वाचन करून संविधानाबद्दलचा आदर व्यक्त केला. यावेळी सर्वांनी संविधानाने दिलेल्या मूल्यांचा सन्मान राखत नागरिक म्हणून आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडण्याची, कर्तव्यनिष्ठ राहण्याचीआणि संविधानाच्या प्रत्येक तत्त्वाचा आदर करण्याची शपथ गांभीर्यपूर्वक घेतली. कार्यक्रमातील या शपथविधीमुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांविषयीची जाणीव अधिक दृढ झाली.

यानंतर श्रीहरी पवार सर यांनी संविधान दिनाचे महत्व सांगून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी संविधानाचा जन्म, त्याचे वैशिष्ट्य, नागरिकांचे हक्क-कर्तव्ये आणि विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये कशी जपावीत याबद्दल प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यामध्ये सनराइज इंग्लिश स्कूलचे हेडबॉय मास्टर प्रद्योत बकाल (वर्ग ९), मास्टर हर्षल गोटे (वर्ग ९) या विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्दिष्टांवर, लोकशाहीच्या मूल्यांवर आणि देशभक्तीवर प्रभावी भाषणे सादर केली. यानंतर प्राचार्या रोज मेरी जोश मॅडमांनी संविधान दिनाचे महत्त्व, विद्यार्थ्यांची जबाबदारी आणि संविधानाचे तत्त्व आचरणात आणण्याचे महत्व यावर मार्गदर्शन केलेकार्यक्रमाच्या शेवटी श्रीहरी पवार सरांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, इतर कर्मचारी यांचा उत्साहपूर्ण सहभाग लाभला आणि संविधान दिवस शाळेत शिस्तबद्ध व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. ता.प्र.

# उत्तमचंद बगडिया महाविद्यालयात संविधान दिन



**रिसोड** : येथील उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्याअर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमात संविधान दिनाचे महत्त्व राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. अजबराव वानखेडे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून केले. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधाना विषयी जागृती निर्माण करण्याकरिता भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. प्रमोद कुमार नंदेश्वर यांनी संविधानाची निर्मिती प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. संविधानाच्या उद्देश पत्रिकेतील लोकशाही मूल्याचे वर्णन करून विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्यांचे जतन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर यांनीआपल्या भाषणात केले.

उपस्थिताचे आभार प्रा. राम जुनघरे यांनी व्यक्त केले. संविधानाच्या जागृती करिता ५० मार्कांची प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. यात विनायक गायकवाड, तेजस कांबळे, कुमारी मोहिनी बनकर यांनी गुणांनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. या कार्यक्रमास डॉ. किरण बुधवंत, डॉ. मंगला खेडेकर, डॉ. मनोज नरवाडे, प्रा. दशरथ प्रजापती, प्रा. विनोद राऊत, प्रा. संदीप जुनघरे, प्रा. सुमित लाहोरे, प्रा. अमरदीप साबळे, प्रा. विठ्ठल वाघ, प्रा. पूजा पाठक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. (वि. प्र)

# सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस अँड रिसर्चचा शपथविधी




महाविद्यालयात यावेळी उपस्थितांना मानवतेची शपथ प्राचार्य संजय पाटील यांनी दिली.

**बडनेरा** : स्थानिक सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस अँड रिसर्चच्या प्रथम वर्ष बी.एस्सी. नर्सिंग/जी.एन.एम./ए.एन.एम. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा दीप प्रज्वलन व शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आरोग्य सेवा (नर्सिंग) आयुक्तालयाच्या सहायक संचालक डॉ. नीलिमा सोनवणे, डॉ. मनोज निचत, पत्रकार नीलेशजी सोमानी, वाशिम कृषिउत्पन्न बाजार समितीचे संचालक गिरीधारलाल सारडा, संस्थेचे सचिव धर्मेंद्र चांभारे, सुजाता स्कूल ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या शांता कलपल्लीवार व संस्थेचे सदस्य साहिल पाटील व सूरज पाटील यांनी दीप प्रज्वलन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य संजय पाटील यांनी मानवतेची सेवा करण्याची प्रतिज्ञा दिली. सिपना कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे हा सोहळा फ्लॉरेन्स नाईटटिंगेल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणि नर्सिंगच्या विद्यार्थिनींच्या व्यावसायिक जीवनाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आला होता. संचालन सोनू खंडारे व संस्कृती मंडवधरे यांनी केले. पूनम भगत यांनी आभार मानले. यात विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व पाल्याचे पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# वाशिम बसस्थानकाची दयनीय अवस्था

## प्रवासी सुरक्षेला धोका, प्रशासन गाढ झोपेत!




**वाशिम** : वाशिम शहरातील प्रमुख प्रवासी केंद्र असलेल्या बसस्थानकाची अवस्था अक्षरशः बिकट झाली असून, प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या परिस्थितीकडे परिवहन विभाग व नगरपरिषद दोघेही डोळेझाक करत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे.

शौचालयाच्या मागे असलेल्या ड्रेनेज टाकीचे झाकण पूर्णपणे उघडे असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. दररोज महिलांसह विद्यार्थी व शेकडो प्रवासी या परिसरातून जात असताना प्रशासन मात्र कोणतीही ठोस कारवाई करण्यात अपयशी ठरत आहे.

पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत परिस्थिती अजूनच बिकट नळांमधून येणारे अस्वच्छ व दूषित पाण्यामुळे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कोलमडल्याचे स्पष्ट दिसते. मूलभूत गरज असलेल्या स्वच्छ पाण्याकडे दुर्लक्ष कशाच्या जोरावर केले जाते, हा नागरिकांचा प्रश्न आहे.

स्वच्छतेची स्थिती तर हाताबाहेर गेली आहे. कचऱ्याचा ढिग, प्लास्टिकचा पसारा, अनियमित साफसफाई आणि दमछाक करणारी दुर्गंधी यामुळे बसस्थानकास येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला मनस्ताप सहन करावा लागत आहे. नगरपरिषद आणि परिवहन विभागातील संयुक्त गैरजबाबदारीचा हा परिपाक असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

बसस्थानकाच्या बाहेरील रस्ता खड्डेमय, उखडलेला व दुरवस्थेत असून पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धुळीच्या लाटांमुळे वाहनचालक व पादचारी धास्तावलेले दिसतात.

स्थानिक नागरिक प्रशासनाला सवाल करत म्हणतात 'हजारो प्रवासी वापरत असलेल्या या बसस्थानकाकडे इतकं मोठं दुर्लक्ष कसं काय सहन केलं जातं?'

प्रवाशांच्या सुरक्षेची घोर उपेक्षा, स्वच्छतेचा बोजवारा आणि मूलभूत सुविधांची पडझड यामुळे नागरिकांत संतापाची लाट पसरली असून तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# पुरुष नसबंदी पंधरवड्यानिमित्त जिल्हा रुग्णालयात नसबंदी शस्त्रक्रिया आयोजित

वाशिम,दि. २८ नोव्हेंबर (जिमाका) ४ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येणाऱ्या पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा अभियानांतर्गत आज जिल्हा रुग्णालय, वाशिम येथे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली.

ही शस्त्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस. ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शस्त्रक्रिया करणारे प्रमुख सर्जन डॉ. अविनाश झरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. पराग राठोड, तसेच आरोग्य निरीक्षक नितीन व्यवहारे, आरोग्य सेवक ध्रुवल मोरे, समाधान इंगोले आणि जिल्हा रुग्णालयातील इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी शस्त्रक्रिया प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविला.

अधिकाधिक लाभार्थ्यांनी पुरुष नसबंदीची निवड करावी आणि कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता वाढविण्यासाठी आरोग्य यंत्रणेने विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस. ठोंबरे यांनी दिल्या. पुरुष नसबंदी सुरक्षित, सोपी व प्रभावी पद्धत असून या पंधरवड्यात अधिकाधिक पुरुषांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे.

# 'महा-देवा फुटबॉल उपक्रम' अंतर्गत निवडक ६० विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार - क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

मुंबई दि.२७ : राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील फुटबॉलमधील प्रतिभेला व्यासपीठ देण्यासाठी महादेवा फुटबॉल उपक्रम अंतर्गत निवड झालेल्या ६० मुला-मुलींना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा),वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्यूआयएफए) आणि व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाऊंडेशन (व्हीएसटीएफ) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, फिटनेस मॉड्यूल तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक खेळाडूला योग्य संधी, सक्षम मार्गदर्शन आणि दर्जेदार सुविधा देण्यात येणार असल्याचे क्रीडामंत्री कोकाटे यांनी सांगितले.